गांधीपर्वाचे साक्षीदार वृक्ष वाचवण्यासाठी गांधीवाद्यांची धडपड

प्रशांत देशमुख, लोकसत्ता

वर्धा : गांधीपर्वाचे साक्षीदार असलेल्या व आता सेवाग्राम विकास आराखड्याआड येणाऱ्या काही वृक्षांची कत्तल झाल्याने गांधीवादी अस्वस्थ झाले आहेत. आता उर्वरित वृक्ष वाचवण्यासाठी गांधीवाद्यांची धडपड सुरू आहे. वृक्षतोडीसाठी प्राथमिक परवानगी देणाऱ्या सेवाग्राम ग्रामपंचायतीच्या उपसरपंचासह सर्व सदस्यांनी या परवानगीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केल्याने हा प्रकार आता कमालीचा संशयास्पद ठरला आहे.

गेल्या दहा वर्षांपासून सेवाग्राम विकास आराखड्याची चर्चा सुरू झाली. ती महात्मा गांधी यांच्या दीडशेव्या जयंतीपर्वावर दोन वर्षापूर्वीच मूर्त स्वरूपात आली. तत्कालीन पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी कामाला गती मिळावी म्हणून तत्परतेने निधी मंजूर केला. सेवाग्राम, पवनार, वर्धा अशा त्रिकोणात बरीच कामे मार्गी लागली. मात्र वर्धेतील गांधी पुतळा ते सेवाग्राम आश्रम या सहा किलोमीटरच्या मार्गाचे रूंदीकरण करण्यासाठी ६७ झाडांची कत्तल करण्यात आली. या प्रकारानंतर केवळ पर्यावरणप्रेमीच नव्हे तर ज्येष्ठ गांधीवादीही अस्वस्थ झाले. स्वातंत्र्यपूर्व काळात महात्मा गांधी, कस्तुरबा व अन्य मान्यवरांनी लावलेल्या या झाडांची कत्तल गांधींच्या नावे होत असलेल्या योजनेतच ध्वस्त झाल्याची बाब गांधीवाद्यांना विदीर्ण करणारी ठरली. ज्या महात्मा गांधींनी अतिरेकी विकासाला नाकारत वृक्षाचे संवर्धन करण्याला प्राधान्य दिले, त्याच महात्म्याच्या जयंती महोत्सवाच्या उत्सवासाठी झालेली वृक्षांची कत्तल दुर्दैवी असल्याचे मत विरोधाच्या अग्रभागी असलेले ज्येष्ठ गांधीवादी डॉ. उल्हास जाजू यांनी व्यक्त केले. किमान या रूंदीकरणाआड येणारी उर्वरित १७० झाडे सुखरूप रहावी म्हणून पर्यावरणप्रेमींनी क्रांतिदिनी भरपावसात रस्त्यावर निषेध केला. हा मार्ग चौपदरी ऐवजी दुपदरी केला तरी पुरेसा असल्याचे मत आंदोलनातील संजय इंगळे तिगावकर यांनी व्यक्त केले. गांधी पुतळा ते सेवाग्राम आश्रम दरम्यानचा मार्ग वृक्ष न कापता विकसित करून एक आदर्श शांतीपथ व्हावा, अशी अपेक्षा निसर्ग सेवा समितीचे बेलखोडे यांनी व्यक्त केली. उघड विरोध दर्शवल्यानंतर बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा झाली आहे. तूर्तास वृक्षतोड थांबवण्यात आली असून रूंदीकरणाबाबत वेगळा पर्याय चर्चेत असल्याचे बेलखोडे यांनी सांगितले.

दरम्यान, या वृक्षतोडीस परवानगी देणाऱ्या सरपंचाविरोधात उर्वरित सर्व सदस्यांनी चौकशी करण्याची विनंती जिल्हाधिकाऱ्यांकडे केली. उपसरपंच सुनील पणत व उर्वरित बारा सदस्यांनी दिलेल्या या निवेदनात वृक्षतोडीबाबत चिंता व्यक्त केली. या वृक्षतोडीस नाहरकत प्रमाणपत्र दिल्याची माहिती नसून परवानगीचा ठराव देखील संमत झालेला नाही. परवानगी असल्याचे सांगणाऱ्या बांधकाम विभागाची भूमिका आश्चर्यकारक असून याप्रकरणी चौकशी करीत दोषींवर कारवाई करण्याची विनंती या सदस्यांनी केली आहे. विशेष म्हणजे, वृक्षतोड थांबवावी म्हणून पर्यावरणप्रेमींनी पालकमंत्री सुनील केदार यांनाही दोन दिवसापूर्वी निवेदन दिले होते. मात्र त्यांनी या विषयावर मौन बाळगल्याने गांधीवाद्यांना धक्काच बसला. याच आराखड्यासाठी मंजूर निधीपैकी काही शासनाने परत घेतल्याने काँग्रेसच्या राजवटीतच आश्रम परिसर विकासाला खीळ बसण्याची बाब काँग्रेस वर्तुळात चर्चेत राहली.

लस देण्याच्या प्रक्रियेवर आज समितीची बैठक

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

नीती आयोगाचे सदस्य डॉ. व्ही. के. पॉल यांच्या नेतृत्वाखालील तज्ज्ञ समितीची लस देण्याची संभाव्य प्रक्रिया व नियमांबाबतची बैठक बुधवारी होणार आहे. त्यात कोविड १९ लस उत्पादन, पुरवठा व्यवस्था व इतर नैतिक बाबींवरही चर्चा करण्यात येणार आहे.

लस देण्याच्या वेळी कुणाला अग्रक्रम द्यायचा, लशीचा पुरवठा कसा असेल अशा अनेक बाबींवर ही समिती विचार करणार आहे. राज्ये, लस उत्पादक कंपन्या यांच्याशीही समिती चर्चा करणार आहे. समितीने लस निर्मितीनंतर ती कुणाला आधी द्यायची, त्यासाठी शीतेपट्यांची व्यवस्था कशी करायची, लस टोचणाऱ्यांना प्रशिक्षण कसे द्यायचे याचा विचार आधीच करण्याचे ठरवले आहे.

तज्ज्ञ समितीची बैठक आज, डॉ. व्ही. के. पॉल यांच्या मार्गदर्शनाखाली होणार असून कोविड १९ वरील दोन लशींच्या पहिल्या टप्प्यातील चाचण्या पार पडल्या आहेत. भारत बायोटेकने भारतीय वैद्यक संशोधन परिषदेच्या मदतीने लस तयार केली होती तर दुसरी लस झायडस कॅडिला लिमिटेड यांनी तयार केली होती. त्यांचा दुसरा टप्पा चालू आहे असे भारतीय वैद्यक संशोधन परिषदेचे प्रमुख बलराम भार्गव यांनी सांगितले.

पुण्याच्या सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया या संस्थेने ऑक्सफर्ड विद्यापीठाने तयार केलेल्या लशीच्या टप्पा २ व टप्पा ३ चाचण्या करण्याचे ठरवले असून त्यांना औषध महानियंत्रकांनी परवानगी दिली आहे.

एअर एशिया इंडिया कंपनीचे दोन वरिष्ठ अधिकारी निलंबित

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

हवाई वाहतूक महासंचालनालयाने एअर एशिया इंडियाच्या दोन अधिकाऱ्यांना सुरक्षा निकषांचे उल्लंघन केल्याप्रकरणी तीन महिन्यांसाठी निलंबित केले असल्याचे मंगळवारी सांगण्यात आले.

याबाबत विचारले असता विमान कंपनीच्या प्रवक्त्याने सांगितले की, हवाई वाहतूक महासंचालनालयाने गेल्या महिन्यात कंपनीला नोटीस दिली असून आम्ही त्याचे पालन केले आहे. एअर एशिया इंडिया ही कंपनी सुरक्षेला महत्त्व देते व महासंचालनालयाच्या अधिकाऱ्यांशी आम्ही संपर्कात आहोत. ज्या काही शंका व्यक्त करण्यात आल्या आहेत त्याचे निरसन केले जाईल.

हवाई वाहतूक महासंचालनालयाने म्हटले आहे की, जून महिन्यात एअर एशियाच्या माजी वैमानिकांनी 'फ्लायिंग बिस्ट' नावाचे यूट्यूब चॅनेल सुरू केले होते. त्यामुळे सुरक्षा नियमांचा भंग झाला आहे. परिणामी संचालन प्रमुख मनीश उप्पल व हवाई सुरक्षा प्रमुख मुकेश निमा यांना जूनमध्येच कारणे दाखवा नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. आता त्यांना तीन महिन्यांसाठी निलंबित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

यूट्यूबवर लोकप्रिय असलेले गौरव तनेजा यांनी १४ जून रोजी ट्विटर संदेशात असे म्हटले होते की, त्यांना एअर एशिया इंडियाने निलंबित केले आहे. १५ जूनला त्यांनी यूट्यूबवर त्यांना वैमानिक पदावरून का काढले याची कारणे सांगणारी चित्रफीत जारी केली होती. तनेजा यांनी असा आरोप केला की, कंपनीने ९८ टक्के विमान अवतरणे फ्लॅप ३ मोडमध्ये करण्यास सांगितले असून त्यात इंधनबचतीचे कारण दिले आहे. जर वैमानिकाने तसे केले नाही तर तो नियमभंग मानला जाईल असे सांगण्यात आले होते.

तनेजा यांनी कंपनीचा हा नियम चुकीचा ठरवला असून विमान उडताना किंवा उतरवताना विमानाच्या पंख्याचे फ्लॅप हे काहीसा अवरोध निर्माण करतात असे म्हटले आहे. इंफाळ विमानतळाचे उदाहरण त्यांनी दिले असून तेथे विमान अगदी निमुळत्या पद्धतीने खाली येते व त्या परिस्थितीत 'फ्लॅप फुल' अवतरण गरजेचे असते. त्यामुळे विमान कंपनीने जे नियम सांगितले आहेत त्यामुळे प्रवाशांची सुरक्षितता धोक्यात येते.

FORM G (2nd Extension)
INVITATION FOR EXPRESSION OF INTEREST
Under Regulation 36A (1) of the Insolvency and Bankruptcy (Insolvency Resolution Process for Corporate Persons) Regulations, 2016
FOR THE ATTENTION OF THE PROSPECTIVE RESOLUTION APPLICANT OF KATARIYA PET PRIVATE LIMITED

SN	PARTICULARS	DETAILS
1.	Name of corporate Debtor	KATARIYA PET PRIVATE LIMITED
2.	Date of incorporation of corporate debtor	30/09/2016
3.	Authority under which corporate debtor is incorporated / registered	Registrar of Companies(ROC), Mumbai.
4.	Corporate Identity No. / Limited Liability Identification number of corporate debtor	U74999PN2016PTC166634
5.	Address of the registered office and principal office (if any) of corporate debtor	GAT NO 3/4/1A, Milkat NO. 2253 Urali Devachi Urali Pune - 412308
6.	Insolvency commencement date of the corporate debtor	Order dated 06/12/2019. Date of appointment of IRP 16/01/2020. Order received on 27/01/2020.
7.	Date of invitation of expression of interest	12/08/2020 (Earlier 15/07/2020) (Original date 10/06/2020)
8.	Eligibility for resolution applicants under section 25(2)(h) of the Code is available at:	Detailed invitation for expression of interest including eligibility along with details of undertaking to be provided by the RA will be made available on request through mail at email ID cirp.katariyapet@gmail.com
9.	Norms of ineligibility applicable under section 29A are available at:	Detailed invitation for expression of interest including norms of ineligibility along with details of undertaking to be provided by the RA will be made available on request through mail at email ID cirp.katariyapet @gmail.com
10.	Last date for receipt of expression of interest	27/08/2020 (Earlier 30/07/2020) (Original date 25/06/2020)
11.	Date of issue of provisional list of prospective resolution applicants	06/09/2020 (Earlier 09/08/2020) (Original date 05/07/2020)
12.	Last date for submission of objections to provisional list	11/09/2020 (Earlier 14/08/2020) (Original date 10/07/2020)
13.	Date of issue of final list of prospective resolution applicants	21/09/2020 (Earlier 24/08/2020) (Original date 20/07/2020)
14.	Date of issue of information memorandum, evaluation matrix and request for resolution plans to prospective resolution applicants.	11/09/2020 (Earlier 14/08/2020) (Original date 10/07/2020)
15.	Manner of obtaining request for resolution plan, evaluation matrix, information memorandum and further information	Will be made available at the address mentioned against S. No. 21 or will be sent through mail, as per the discretion of IRP.
16.	Last date for submission of resolution plans	11/10/2020 (Earlier 13/09/2020) (Original Date 09/08/2020)
17.	Manner of submitting resolution plans to Resolution professional	By post (should reach the office address mentioned against S. No. 21 by 11th October, 2020) or through mail.
18.	Estimated date for submission of resolution plan to the Adjudicating Authority for approval	31/10/2020
19.	Name and registration number of the resolution professional	Megha Agrawal IBBIReg no.. : **IBBI/IPA/-001/IP-P-01456/2018-2019/12272**
20.	Name, Address and e-mail of the resolution professional, as registered with the Board	Address: - 001, Shivranjini Apartments, In Circle of Congress Nagar Garden, Congress Nagar, Nagpur-400012. E-mail: ip.meghaagrawal@gmail.com
21.	Address and email to be used for correspondence with the Interim resolution professional	Address:- 13, 2nd floor, NKY Towers, Wardha Road, Nagpur-440010. E-mail:cirp.katariyapet@gmail.com
22.	Further Details are available at or with	**Megha Agrawal Email Id:** cirp.katariyapet@gmail.com
23.	Date of publication of Form G	12/08/2020

Date :- 12/08/2020
Place :- Nagpur
Megha Agrawal
Resolution Professional
For Katariya Pet Pvt Ltd.
IBBI Reg.No. :- IBBI/IPA/-001/IP-P-01456/2018-2019/12272

Capgemini
कॅपेजेमिनी टेक्नोलॉजी सर्व्हिसेस इंडिया लिमिटेड
सीआयएन : यू85110पीएन1993पीएलसी145950
नोंदणीकृत कार्यालय : क्र. 14, राजीव गांधी इन्फोटेक पार्क, हिंजवडी फेज - III, एमआयडीसी-एसईझेड, गाव माण, तालुका मुळशी, पुणे - 411057, महाराष्ट्र, भारत
ईमेल : cgcompanysecretary.in@capegemini.com
संकेतस्थळ : https://www.capegemini.com/in-en/what-we-do/group-overview/capegemini-technology-services-india-limit-edformerly-known-as-igate-global-solutions-limited/
दूरध्वनी: +91 20 66991000; **फॅक्स:** +91 20 66995050

सभासदांना टपाली मतदानाची सूचना

कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियमावली, 2014 च्या लागू असलेल्या नियमांच्या सह वाचल्या जाणाऱ्या कंपनीज कायदा, 2013 (कायदा) च्या कलम 110 च्या अनुसार, कॅपेजेमिनी टेक्नोलॉजी सर्व्हिसेस इंडिया लिमिटेड (''कंपनी'') च्या सभासदांना ह्याद्वारे कळविण्यात येत आहे की टपाली मतदान सूचना (''सूचना'') मध्ये नमूद करण्यात आलेल्या विशेष ठरावांच्या द्वारे सभासदांची संमती मिळविण्यासाठी दूरस्थ ई-मतदानाच्या द्वारे टपाली मतदानाच्या प्रक्रियेचा वापर करणार असल्याचे कळविण्यात येत आहे. कंपनीने सूचना दिनांकित 04 ऑगस्ट 2020 ई-मेलद्वारे त्यांच्या सर्व सभासदांना ज्यांनी त्यांच्या ई-मेल आयडीची नोंद कंपनी किंवा डिपॉझिटरी/ डिपॉझिटरी पार्टीसिपंट ह्यांच्याकडे नोंदविला आहे त्यांना ई-मेलद्वारे खालील व्यवसायाच्या संदर्भात पाठविण्याचे काम पूर्ण केले आहे.

कॅपेजेमिनी एसई एम्प्लॉई स्टॉक ओनरशिप प्लान, 2020 चे ग्राहक होण्यासाठी कर्मचाऱ्यांना आर्थिक आणि/ किंवा कर्ज/ वित्तिय सहाय्याच्या तरतुदीला संमती देणे.

कंपनी व्यवहार मंत्रालयाद्वारे पारीत करण्यात आलेल्या सामान्य परिपत्रक क्र. 17/2020 दिनांकित 13 एप्रिल 2020 आणि परिपत्रक क्र. 22/2020 दिनांकित 15 जून 2020 सह वाचल्या जाणाऱ्या सामान्य परिपत्रक क्र. 14/2020 दिनांकित 08 एप्रिल 2020 (''एमसीए परिपत्रके'') च्या मान्यतेच्या अनुसार कंपनीने केवळ इलेक्ट्रॉनिक पद्धतीनेच पाठवले आहे. सदर सूचना कंपनीच्या संकेतस्थळावरून म्हणजेच https://www.capegemini.com/in-en/what-we-do/group-overview/capegemini-technology-services-india-limited-formerly-known-as-igate-global-solutions-limited/ वरून देखील डाउनलोड करता येईल.

असे सभासद ज्यांनी त्यांच्या ई-मेल आयडीची नोंद केलेली नाही त्यांना विनंती करण्यात येत आहे की ई-मेल आयडीची नोंद खाली देण्यात आलेली प्रक्रिया पूर्ण करून नोंदवावेतः

ए. सभासदांना त्यांच्या ई-मेल आयडीची तात्पुरती नोंद केफिन टेक्नोलॉजीस प्रायवेट लिमिटेड ह्यांच्याकडे पुढील संकेतस्थळ/ पेज : https://karisma.kfintech.com/emailreg वर नोंदविता येईल आणि त्यामध्ये देण्यात आलेल्या नोंदणीकरणाच्या पद्धतीनुसार नोंदविता येईल. ई-मेल आयडीची नोंद यशस्वीपणे झाल्यानंतर सभासदांना सूचनेची आणि सदर टपाली मतदानासाठी दूरस्थ ई-मतदानासाठी यूजर आयडी आणि पासवर्डसह दूरस्थ ई-मतदानाच्या प्रक्रियेची सॉफ्ट कॉपी प्राप्त करता येईल.

बी. सभासदांना ज्यांच्या ई-मेल आयडीची कायमस्वरूपी नोंद करायची असल्यास, इलेक्ट्रॉनिक स्वरूपामध्ये धारणा केली असल्यास त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी पार्टीसिपंट ह्यांच्याकडे आणि प्रत्यक्ष धारणा जर केली असल्यास केफिन टेक्नोलॉजीस प्रायवेट लिमिटेड, सेलेनियम, टॉवर बी, प्लॉट 31 आणि 32, गचीबोवली, फायनॅन्शियल डिस्ट्रीक्ट, नानाक्रमगुडा, हैद्राबाद - 500032, भारत ह्यांच्याकडे योग्य त्या प्रक्रियेच्या माध्यमातून नोंदणी करावी. जर कोणतीही समस्या असल्यास सभासद : einward.ris@kfintech.com वर मेल करू शकतात.

टपाली मतदानासाठी ई-मतदानाचा तपशिल खालील प्रमाणे आहे. वितिर्त दिनांक आणि वेळेच्या नंतर ई-मतदान करता येणार नाही.

मतदान सुरु होण्याचा दिनांक	12 ऑगस्ट 2020 रोजी सकाळी 09:00 वा. पासून पुढे
मतदानाच्या समाप्तीचा दिनांक	10 सप्टेंबर 2020 रोजी सायं. 5:00 वा. पर्यंत
मतदानाच्या निकालाच्या घोषणेचा दिनांक	13 सप्टेंबर 2020 रोजी किंवा त्यापूर्वी

संचालक मंडळाने शैलेश इंदापूरकर अँड असोसिएट्स, कंपनी सचिव ज्यांचे कार्यालय, राधा रमकृष्ण सोसायटी, सदनिका क्र. 5, 1 ला मजला, 1626, सदाशिव पेठ, गोपाळ गावन समाज रोड, पुणे 411030 च्या श्री. शैलेश इंदापूरकर ह्यांची ई-मतदानाच्या द्वारे टपाली मतदानाची पक्रिया निष्पक्ष आणि पारदर्शी पद्धतीने पार पाडण्यासाठी आणि नमूद कायद्याच्या आणि नियमांच्या तरतुदींच्या अंतर्गत छाननीकर्ते (''छाननीकर्ते'') म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

सूचना जर प्राप्त झाली नसल्यास किंवा ई-मतदानाची समस्या जर असल्यास किंवा अन्य कोणत्याही तक्रारीसाठी सभासद श्री. आनंदन के, व्यवस्थापक, केफिन टेक्नोलॉजीस प्रायव्हेट लिमिटेड, einward.ris@kfintech.com किंवा evoting@karvy.com वर आणि श्रीमती आर्मीन बिलिमोरिया, कंपनी सचिव ह्यांच्याकडे cgcompanysecretary.in@capegemini.com ह्या मेल आयडीवर संपर्क करता येईल.

कंपनीने केवळ इलेक्ट्रॉनिक स्वरूपामध्ये सर्व अशा सभासदांना ज्यांची नावे शुक्रवार, 31 जुलै 2020 (कट ऑफ दिनांक) नुसार सभासदांच्या नोंदवही मध्ये आलेली आहेत त्यांना नोटीस पाठविली आहे. असे सभासद त्यांच्या मतदानाचा अधिकार सूचनेमध्ये देण्यात आलेल्या तपशिलानुसार करू शकतात. कोणीही व्यक्ती जो कंपनीचा सभासद कट ऑफ दिनांकाच्या नुसार नाही त्यांनी सदर सूचना ही केवळ त्यांच्या माहितीसाठी असल्याचे समजावे.

कॅपेजेमिनी टेक्नोलॉजी सर्व्हिसेस इंडिया लिमिटेड, करीता
सही/-
अर्मिन बिलिमोरिया
कंपनी सचिव

ठिकाण: मुंबई
दिनांक: 11 ऑगस्ट 2020

एन्केजीएस्बी बँक
एन्केजीएस्बी को-ऑप. बँक लि.
(मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक)
SINCE 1917

आमच्या एमएसएमई कर्ज योजनेसह आपला व्यवसाय वाढवा

एमएसएमई कर्ज योजना

कॅश क्रेडिट | इम्पोर्ट / एक्स्पोर्ट फायनान्स | लेटर ऑफ क्रेडिट
बँक गॅरंटी | बिझनेस एक्सपान्शन

आकर्षक व्याज दर
ईझी डॉक्यूमेंटेशन
जलद मान्यता

कर्ज योजनेचा लाभ घेण्यासाठी मिस्ड कॉल द्या
022 28602020

नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता: लक्ष्मी सदन, ३६१, व्ही.पी.रोड, गिरगांव, मुंबई-४०० ००४.

अॅसिडीटी? थकवा, सर्दी? खोकला? मधुमेह? उच्च रक्तदाब? वेट मॅनेजमेंट? झोपेच्या तक्रारी? व सर्व आरोग्य तक्रारींवर

Tanvi HERBALS क्लिनिक
फ्री हेल्थ चेकअप

- आजच भेट द्या ठाणे घंटाळी येथील तन्वी हर्बल क्लिनिकला.
- नाडी परिक्षण करून वात, पित्त, कफ प्रकृती जाणून मग तन्वी हर्बल्सची कॉम्बिनेशन सुचवली जातील.
- संधीवात, वातव्याधी, पार्कीन्सन्स, पीसीओडी,मानसिक आजार, हेअरफॉल, डॅन्ड्रफ, पिंपल्स, ह्रदय विकार, मधुमेह इ. सर्व विकारांवर तन्वी संचालकांचे मार्गदर्शन उपलब्ध
- २० वर्षांपासून तन्वी डॉक्टर्स उत्तम रिझल्ट्स देताहेत.

तन्वी संचालक **डॉ.पुष्कराज धामणकर** यांना भेटा.
वेळ : सकाळी ११ ते दुपारी १ वाजेपर्यंत.
अपॉईंटमेंटसाठी आजच संपर्क करा.
घंटाळी ठाणे 9769695892
तन्वी ऑफिस 9820075813 / 12 / 25415006, 25380063

Sankalp Education Society
ISMS Sankalp Business School
info@ismspune.in | +91 7350 15 15 15 / 8796 15 15 15 | www.ismspune.in
(Approved by AICTE, Govt of Maharashtra and Affiliated to SPPU)

APPLICATIONS ARE INVITED
(For MBA Course)

Teaching / Non Teaching
Director / Associate Professor
Assistant Professor / Librarian

Educational qualifications, experience, pay scales as per AICTE, Govt. of Maharashtra & Savitribai Phule Pune University norms.
Ph. D Guideship of SPPU is desirable.
Minimum 2 years relevant experience after aquiring the Master's degree is mandatory.

Eligible & interested candidates can apply

LAST DATE OF APPLICATION
20th AUG 2020

Ambegoan Campus: S.No. 9/1/1, Wadgaon Budruk, Ambegaon, Pune-411 041, Maharashtra
Email: info@ismssbs.in

Secretary: Sankalp Education Society

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

एकमेव लोकमान्य

प्रत्येक सुसंस्कृत घरात असायलाच हवा...

amazon.in आणि सर्व विक्रेत्यांकडे उपलब्ध

बाळ गंगाधर टिळक या हिमालयाएवढ्या व्यक्तिमत्त्वाचा अनेक अंगांनी घेतलेला वेध. गणिती टिळक, तत्त्वज्ञ टिळक, कायदाभ्यासक टिळक, संपादक टिळक, अर्थभाष्यकार टिळक, राजकारणी टिळक आणि तरीही या सर्वांवर पुरून उरणारे **लोकमान्य बाळ गंगाधर टिळक**.

स्मृती शताब्दीनिमित्ताने या तेजःपुंज व्यक्तिमत्त्वास अनेक अभ्यासूजनांनी वाहिलेली आदरांजली.

लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटी लि.
महाराष्ट्र • कर्नाटक • गोवा • दिल्ली
TOLL FREE : 1800 212 4050 | www.lokmanyasociety.org

प्रस्तुत
लोकसत्ता एकमेव लोकमान्य

सहप्रायोजक
Gravittus CORP Towards a better world
मे. वी. जी. चितळे® चितळे डेअरी

ऑडिओ बुक पार्टनर storytel
पॉवर्ड बाय PCET NMVPM THE TILAK CHRONICLE

- अधिक माहितीसाठी संपर्क -

पुणे - पिंपरी- भोसरी-निगडी: अमोल गाडगीळ - ९८८१२५६०८२ ● **चिंचवड, काळेवाडी:** सुधीर मराठे - ८३०८३६६८७१ ● **येरवडा, चंदननगर, विश्रांतवाडी, पेठ एरिया:** सचिन झारगड - ९८८१२५६०२२ ● **डेक्कन, स्टेशन:** विकास जाधव - ८६५५३४१०६८ ● **हडपसर, धनकवडी, कोंढवा, पद्मावती:** जितेंद्र भोईणकर - ८२९१३०८६९५ ● **कोथरूड, कर्वे नगर, वारजे, भुसारी कॉलनी:** महेश जाधव - ९०११०१७७२० ● **स्वारगेट, क्वार्टरगेट, अरोरा टॉवर्स:** सागर चौधरी - ९७६७७२६८१० ● **नळ स्टॉप, पानमळा, धायरी:** तुषार रायकर - ९९२३२५८७९० ● **युनिव्हर्सिटी, सांगवी, बोपोडी:** किशोर अमराळे - ९८८१६४२३२३ ● **पुणे जिल्हा आणि सोलापूर:** दिपक क्षीरसागर - ९८८१२५६०४९ ● **सांगली आणि कोल्हापूर:** संदीप गिरीगोसावी- ९६५७२५५२७७ ● **सातारा:** सर्जेराव कातीवले - ८८८८८७५४८६.